UGC Approved Multidiciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

8th March 2019 , Special Issue – 106(A)

# MALE FEMALE RATIO IMBALANCE IN INDIA

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. A.M. More
Dept. of Economics
Vasundhara College, Ghatnandur,
Tq. Ambajogai, Dist. Beed

RESEARCH JOURNEY

Scanned with Oken Scanner

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 106(A) | March. 2019 | UGC Approved No. 40705
Male Female Ratio Imbalance in India

34. स्त्री-पुरूष गुणोत्तरातील असमानता : कारणे व उपाय — 103
डॉ.डी.बी.तांदुळजेकर

35. बीड जिल्हयातील लोकसंख्येत असमानता : एक समाजशास्त्रीय अभ्यास — 106
डॉ. संजय गंगाराम सुरेवाड

36. "मराठवाडयातील स्त्री-पुरुष असमानतेची वास्तविकता" — 108
प्रा. सिताफुले एल्. एस्.

37. महाराष्ट्रातील स्त्री - पुरूष प्रमाणातिल असमानता : कारणे आणि उपाय — 112
प्रा. गोविंद रामराव काळे

38. महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष गुणोत्तरा मधील असमतोल :- एक समस्या — 115
प्रा. डॉ. रनमाळ पांडूरंग श्रीरंगराव

39. भारतातील लिंगगुणोत्तर–एक विश्लेषणात्मक अध्ययन — 117
डॉ. विष्णु एकनाथ गुमटकर

40. भारतातील राज्यस्तरीय स्त्री–पुरुष असमानता – एक अभ्यास — 120
प्रा. डॉ. अर्जुन मोरे

41. भारतीय स्त्री-पुरुष गुणोत्तरातील असंतुलन आणि धर्म — 123
प्रा. डॉ. शैलजा बरुरे,

42. महाराष्ट्र व मराठवाड्यातील स्त्री-पुरुष प्रमाण : एक अभ्यास — 126
प्रा. डॉ. सुरेश वसंतराव खोंड

43. भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरातील असमतोल एक अध्यायन — 129
प्रा.किर्दत विलास गोपीनाथराव , प्रा.गोदाम रवि शाम

44. स्त्रीयांकडे पाहाण्याचा समाजाचा दृष्टीकोण — 131
प्रा. डॉ. संजय खाडप

45. भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरातील असमतोल : एक अभ्यास — 133
प्रा.श्रीमंत तुकाराम कावळे, फड महादेवी वैजेनाथ

46. भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरातील असमतोल : एक सैध्दांतीक विश्लेषण — 136
प्रा. डॉ. काशिद रामभाऊ देवराव

47. महाराष्ट्र राज्यातील घटते लिंगगुणोत्तर : कारणे व उपाययोजना — 139

48. डॉ. संजय काळे

49. स्त्री–पुरूष प्रमाण महाराष्ट्र आणि देशातील तुलनात्मक स्थिती — 142
प्रा.डॉ.मदन.शेळके

50. "भारतातील स्त्री–पुरुष प्रमाणातील असंतुलन –कारणे व उपाययोजना" — 146
डॉ.डी.बी.सोळूंके

51. भारतातील स्त्री–पुरुष गुणोत्तरातील असमतोल — 150
प्रा. डॉ. अशोक पुरभाजी टिपरसे

भारतातील राज्यनिहाय स्त्री - पुरुष असमानता
डॉ. अनंता बापुराव देशमुख

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) – 0.676 Special Issue – 106(A) | March 2019 | UGC Approved No. 40705
Male Female Ratio Imbalance in India

# महाराष्ट्र राज्यातील घटते लिंगगुणोत्तर : कारणे व उपाययोजना

**डॉ. संजय काळे**
अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदु महाविद्यालय,भोकर जि. नांदेड

---

**प्रस्तावना**

संयुक्त राष्ट्रसंघाने 1975 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणुन घोषीत केले. पुढे लगेचच 1975 ते 1985 हे दशक 'आंतरराष्ट्रीय महिला दशक' म्हणून घोषीत केले. यानंतर खऱ्या अर्थाने स्त्रियांसाठी आधी कल्याणकारक पुढे विकासात्मक व त्यापुढे सक्षमीकरण असा प्रवास सुरु झाला. त्यासाठी स्त्रियांच्या हक्काधारित कार्यक्रमाची भारतात सुरुवात झाली. देशात जन्म लिंग गुणोत्तरात होत असलेली घट ही विचार करायला लावणारी आहे. गर्भलिंग निदानामुळे मुलींच्या घटलेल्या संख्येचा मुद्दा दिवंगत डॉ. मालिनी कालकर, डॉ. आशा भेंडे अशा दिग्गज स्त्रीवादी लोकसंख्या शास्त्रज्ञांनी जगासमोर आणला, तो लिंगाधारीत भेदभावाचा मुद्दा म्हणुन परंतु शासकीय यंत्रणानी हा मुद्दा म्हणजे केवळ संख्येचा मुद्दा करुन ठेवला. स्त्री-पुरुष यांच्या संख्येत जी विषयमता आली आहे, त्यावर अनेक विचारवंतानी चिंता व्यक्त केली. सोनोग्राफीसारख्या आधुनिक तंत्राच्या गैरवापरामुळे ही समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. मेयर यांनी लिंगभेदाच्या बाबतीत असे सांगीतले की, पुर्वी आणि आजदेखील संशोधनाचा अभाव आणि लोकसंख्याविषयक घटकावर विचार न झाल्यामुळे पुढे येणाऱ्या परिस्थितीत लिंगभेद बदलत गेला.
सदरील शोधनिबंधात महाराष्ट्र राज्यातील जागतिकीकरणानंतर जिल्हानिहाय / विभागनिहाय लिंग गुणोत्तरातील बदलाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**लिंग गुणोत्तरप्रमाण :-**

एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील पुरुषांची संख्या व स्त्रियांची संख्या या दोहोमधील प्रमाणास लिंगगुणोत्तर असे म्हणतात. दर एक हजार पुरुषांच्या लोकसंख्येबरोबर स्त्रियांची संख्या किती आहे, यावरुन लिंगगुणोत्तर काढले जाते. लिंगगुणोत्तराने आपल्याला पुरुष व स्त्री लोकसंख्येतील संतुलन राखता येवू शकते. जर पुरुष व स्त्रीयांच्या प्रमाणात असंतुलनपणा आला तर त्याचा परिणाम सामाजिक, आर्थिक व समूहजीवनाच्या जीवनमानावर होते. भारताच्या बाबतीत लिंगगुणोत्तराबाबत बोलायचे झाले तर, स्त्री अपत्यापेक्षा पुरुष अपत्याला अधिक प्राधान्य देण्यात येते. नाकारण्यात येणाऱ्या स्त्रीअपत्यामुळे किंवा त्यांच्या मृत्युदरामुळे लिंगभेदाच्या विषमतेवर खुप मोठा परिणाम होतो.

**महाराष्ट्रातील लिंगगुणोत्तर :**

महाराष्ट्रातील घटत जाणारे प्रमाण हे समाजात केल्या जाणाऱ्या लिंग भेदभावाचे स्पष्ट निर्दशक आहे. सन 1961 ते 2011 या कालावधीतील जनगणनेचा विचार केल्यास 1981 चा अपवाद वगळता सातत्याने महिलांच्या संख्येत घट झाल्याचे आढळून येते. सन 2011 मध्ये भारतात एक हजार पुरुषामागे 940 स्त्रीया होते, तर महाराष्ट्रात हे प्रमाण 925 होते. 0 ते 6 वयोगटातील मुला-मुलींचे राज्यातील सरासरी प्रमाण दर हजार मुलामागे 883 मुली होते. यामुळे स्त्री-पुरुष प्रमाणाचा वाढता असमतोल आज एक गहन समस्या बनली आहे.
राज्यातील जिल्हानिहाय व विभागनिहाय लिंग गुणोत्तरातील असमतोल पुढीलप्रमाणे दर्शविता येईल.

**विदर्भातील लिंग गुणोत्तर प्रमाण : तक्ता क्रमांक 01**

| अ.क्र. | जिल्हा / विभाग | 1991 | 2001 | फरक | 2001 | 2011 | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपुर | 922 | 932 | +10 | 932 | 948 | +16 |
| 2 | वर्धा | 939 | 935 | -4 | 935 | 946 | +11 |
| 3 | अमरावती | 936 | 938 | +2 | 938 | 947 | +9 |
| 4 | यवतमाळ | 951 | 942 | -9 | 942 | 947 | +5 |
| 5 | बुलढाणा | 953 | 946 | -7 | 946 | 928 | -18 |
| 6 | अकोला | 939 | 938 | -1 | 938 | 942 | +4 |
| 7 | वाशिम | - | 939 | - | 939 | 926 | -13 |
| 8 | चंद्रपुर | 948 | 948 | 0 | 948 | 959 | +11 |
| 9 | गडचिरोली | 976 | 976 | 0 | 976 | 975 | -1 |
| 10 | भंडारा | 988 | 981 | -7 | 981 | 984 | +3 |
| 11 | गोंदिया | - | 1005 | - | 1005 | 996 | -9 |
| | विदर्भ | 950 | 952 | +2 | 952 | 954 | +2 |

**मराठवाड्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण : तक्ता क्रमांक 02**

| अ.क्र. | जिल्हा / विभाग | 1991 | 2001 | फरक | 2001 | 2011 | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | औरंगाबाद | 922 | 925 | +3 | 925 | 917 | -8 |
| [illegible] | जालना | 958 | 951 | -7 | 951 | 929 | -22 |
| [illegible] | परभणी | 953 | 958 | +5 | 958 | 940 | -18 |
| [illegible] | गोली | - | 953 | - | 953 | 935 | -18 |
| [illegible] | ड | 945 | 942 | -3 | 942 | 937 | -5 |
| [illegible] | [illegible] | 934 | 936 | +2 | 936 | 912 | -24 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) - 0.676 Special Issue - 106(A) | March 2019 | UGC Approved No. 40705
Male Female Ratio Imbalance In India

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | उस्मानाबाद | 937 | 932 | -5 | 932 | 920 | -12 |
| 8 | लातुर | 942 | 935 | -7 | 935 | 924 | -11 |
| | मराठवाडा | 941 | 941 | 0 | 941 | 926 | -15 |

पश्चिम महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रमाण : तक्ता क्रमांक 03

| अ.क्र. | जिल्हा / विभाग | 1991 | 2001 | फरक | 2001 | 2011 | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुणे | 933 | 919 | -14 | 919 | 910 | -9 |
| 2 | सोलापुर | 934 | 935 | +1 | 935 | 932 | -3 |
| 3 | सातारा | 1029 | 995 | -34 | 995 | 986 | -9 |
| 4 | सांगली | 958 | 957 | -1 | 957 | 964 | +7 |
| 5 | कोल्हापुर | 961 | 949 | -12 | 949 | 953 | +4 |
| | पश्चिम महाराष्ट | 963 | 951 | -12 | 951 | 949 | -2 |

कोकणातील लिंग गुणोत्तर प्रमाण : तक्ता क्रमांक 04

| अ.क्र. | जिल्हा / विभाग | 1991 | 2001 | फरक | 2001 | 2011 | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | 818 | 858 | +40 | 858 | 838 | -20 |
| 2 | ठाणे | 879 | 777 | -102 | 777 | 880 | +103 |
| 3 | रायगड | 1010 | 976 | -34 | 976 | 955 | -21 |
| 4 | रत्नागिरी | 1205 | 1136 | -69 | 1136 | 1123 | -13 |
| 5 | सिंधुदुर्ग | 1137 | 1079 | -58 | 1079 | 1037 | -42 |
| | कोकण | 1009 | 965 | -44 | 965 | 966 | +1 |

उत्तर महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रमाण : तक्ता क्रमांक 05

| अ.क्र. | जिल्हा / विभाग | 1991 | 2001 | फरक | 2001 | 2011 | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नाशिक | 940 | 927 | -13 | 927 | 931 | +4 |
| 2 | जळगांव | 940 | 933 | -7 | 933 | 922 | -11 |
| 3 | धुळे | 958 | 944 | -14 | 944 | 941 | -3 |
| 4 | नंदुरबार | - | 977 | - | 977 | 972 | -5 |
| 5 | अ.नगर | 949 | 940 | -9 | 940 | 934 | -6 |
| | उत्तर महाराष्ट्र | 946 | 944 | -2 | 944 | 940 | -4 |

Source : Censusindia.gov.in

भारत व महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर व प्रमाण : तक्ता क्र. 06

| अ.क्र. | | 1991 | 2001 | फरक | 2001 | 2011 | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र | 934 | 922 | -12 | 922 | 925 | +3 |
| 2 | भारत | 927 | 933 | +6 | 933 | 940 | +7 |

तक्ता क्र. 01 मध्ये विदर्भातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तरातील असमतोल दर्शविले आहे. सन 1991 च्या तुलनेत 2001 मध्ये नागपुर, अमरावती वगळता विदर्भातील सर्वच जिल्ह्यात लिंगगुणोत्तरात घट झाल्याचे दिसुन येते. सन 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये बुलढाणां, वाशिम, गोंदिया जिल्ह्यात लिंगगुणोत्तरात घट झाली आहे. बुलढाणां आणि वाशिम जिल्ह्यातील ही घट अनुक्रमे 18 व 13 याप्रमाणे राहीली आहे. संपुर्ण विदर्भाचा विचार करता सन 1991 ते 2011 या कालावधीत प्रत्येक जनगणनेच्या वेळेस लिंगगुणोत्तरात केवळ 2 नी वाढ झाल्याचे दिसुन येते.

तक्ता क्रमांक 02 मध्ये मराठवाड्यातील आठ जिल्ह्याचे लिंगगुणोत्तर दर्शविले आहे. सन 1991 व 2001 मध्ये मराठवाड्यातील लिंगगुणोत्तर 971 होते. हे लिंगगुणोत्तरव सन 2011 मध्ये 926 झाले. म्हणजेच मराठवाड्यातील लिंगगुणोत्तरात 15 नी घट झाली आहे. सन 2001 च्या तुलनेत मराठवाड्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यात लिंगगुणोत्तर ऋण राहीले. सर्वाधिक घट बीड, जालना, परभणी, हिंगोली या जिल्ह्यात होती.

तक्ता क्र. 03 मध्ये पश्चिम महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यातील लिंगगुणोत्तरातील फरक दर्शविला आहे. सन 1991 च्या तुलनेत 2001 मध्ये सातारा जिल्ह्यातील लिंगगुणोत्तरातील घट सर्वाधिक म्हणजे 34 होती. उर्वरित जिल्ह्यात लिंगगुणोत्तर देखील ऋण असल्याचे दिसुन येते. परंतु 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये सांगली आणि कोल्हापुर जिल्ह्यातील लिंगगुणोत्तरात अल्पशी वाढ झाली आहे. संपुर्ण पश्चिम महाराष्ट्राचा विचार करता सन 2001 मध्ये लिंगुणोत्तरातील घट 12 होती ती पुढे 2011 मध्ये 2 होती.

तक्ता क्र. 04 मध्ये कोकणातील पाच जिल्ह्यांचा लिंगगुणोत्तर दर्शविले आहे. कोकण विभागातील लिंगगुणोत्तरातील असमतोल चिंताजनक असल्याचे दिसुन येते. सन 1991 च्या तुलनेत सन 2001 मध्ये मुंबई वगळता सर्वच जिल्ह्यात लिंगगुणोत्तरात मोठ्याप्रमाणात घट होत गेली आहे. ठाणे जिल्ह्यातील हा फरक 102 होता, त्यापाठोपाठ रत्नागिरी जिल्ह्यात 69, सिंधूदुर्ग 58 होता. तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कोकणातील पाच जिल्हाचा विचार केल्यास कोकण विभागातील लिंगगुणोत्तर सन 1991 मध्ये स्त्रीयांचे प्रमाण पुरुशांपेक्षा जास्त होते. परंतु सन 2001 मध्ये यामध्ये 44 नी घट झाली. सन 2001 आणि 2011 मध्ये यामध्ये 44 नी घट झाली. सन 2001 आणि 2011 चा विचार केल्यास लिंगगुणोत्तर स्थिर राहिल्याचे दिसुन येते.

तक्ता क्र. 05 मध्ये उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांचा लिंगगुणोत्तर दर्शविले आहे. सन 1991 च्या तुलनेत 2001 मध्ये सर्वच पाच जिल्ह्याचा लिंगगुणोत्तर ऋण राहिल्याचे दिसुन येते. लिंग गुणोत्तरातील फरक सर्वाधिक धुळे, नाशिक जिल्ह्यात असल्याचे दिसुन येते. सन 2001 आणि 2011 या दशकातील विचार केला असता नाशिक वगळता सर्वच जिल्ह्यातील लिंगगुणोत्तरात घट झाल्याचे दिसुन येते. उत्तरव महाराष्ट्राचा एकुण विचार केल्यास सन 1991 आणि 2001 या दशकात लिंग गुणोत्तरातील फरक ऋण दोन (-2) आणि 2001 ते 2011 या दशकातील फरक ऋण चार (-4) राहिले आहे.

तक्ता क्र. 06 मध्ये महाराष्ट राज्यातील व भारतातील लिंगगुणोत्तर दर्शवित आहे. भारताच्या तुलनेत महाराष्ट्रातील लिंगगुणोत्तर खुप कमी राहिल्याचे दिसुन येते. सन 2011 मध्ये महाराष्ट्राचे लिंगुणोत्तर 925 होते, तर भारताचे लिंगगुणोत्तर 940 होते. राज्याचा घटता लिंगगुणोत्तर ही एक प्रमुख समस्या म्हणुन पुढे येत आहे.

एकंदरीत महाराष्ट्रातील 1991-2001 या दशकातील लिंगगुणोत्तरातील घट अधिक राहीली असुन 2001-2011 या दशकात ही घट स्थिर राहील्याचे दिसून येते. राज्यातील पाच विभागाचा विचार केल्यास लिंगुणोत्तरातील ही घट 1991-2001 या दशकात कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक होती, तर मराठवाडा आणि विदर्भातील ही घट स्थिर असल्याचे दिसून येते उत्तर महाराष्ट्रातील घट देखील अल्पप्रमाणात होती. सन 2001-2011 या दशकाचा विचार केल्यास मराठवाड्यातील लिंगगुणोत्तरातील घट राज्यातील पाच विभागत सर्वाधिक होती. महाराष्ट्रातील लिंगगुणोत्तर आणि भारतातील लिंगगुणोत्तरातील घट अधिक आहे. सन 2011 मध्ये राज्यातील लिंगगुणोत्तर 925 होते, तर भारताचे लिंगगुणोत्तर 940 होते. म्हणजेच देशाच्या तुलनेत देखील राज्यातील लिंगगुणोत्तरातील असमतोल अधिक आहे.

**महाराष्ट्रातील लिंगगुणोत्तरात घट होण्याची कारणे :-**

1) महाराष्ट्र शासनाने सन 2002 मध्ये केलेल्या मानव विकास अहवालानुसार राज्यातील 84% महिलांना आपल्या किमान एकतरी मुलगा असला पाहिजे असे वाटते.
2) रुढी परंपरावर आधारीत समाजरचनेने लोकांच्या मनावर असे बिंबवले आहे की, मुलगा म्हणजे वंशाचा दिवा या पारंपारिक विचारसरणीमुळे मुलांच्या तुलनेत मुर्लीची घट झालेली आढळते.
3) गर्भलिंग निदानामुळे स्त्रीभ्रूणहत्या होवुन मुर्लीच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.
4) समाजातील हुंडा पद्धतीसारख्या अनिष्ठ चालीरितीमुळे मुलगी नको अशी समाजाची मानसिकता झाली आहे.

**उपाययोजना :-**

1) गर्भलिंग निदानाचा मुद्दा केवळ संख्यात्मक पद्धतीने न हाताळता समाजातील लिंगभाव असमानता कशी मिटेल यासाठी प्रयत्न करावे लागतील.
2) गर्भलिंग निदान विरोधी कायद्यासोबत बालविवाह विरोधी कायदा, स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अथवा कौटुंबिक हिंसाचाराविरोधी कायदे व कार्यक्रम, स्त्रियांच्या संपत्तीच्या अधिकाराविषयी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, स्त्रियांच्या शोषणाविरोधात धोरणे व कार्यक्रम अशा विविध उपायोजना करण्याची गरज आहे.
3) समाजातील मुर्लीचे प्रमाण वाढविण्यासाठी किंवा संतुतील पातळीवर आणण्यासाठी समाजातील पुरुषांच्या आणि महिलांच्या मानसिक तथा वैचारीक पातळीत बदल करणे गरजेचे आहे.
4) ग्रामीण भागात मुर्लीच्या शिक्षणाबावत जानीवपुर्वक हेळसांड केली जाते. त्यासाठी मुर्लीसाठी शिक्षणात कृती योजनेवर भर देण्यात यावा. शिक्षणामुळे महिलांचा सर्वांगीन विकास होवुन त्यांना एक मानाचे स्थान समाजात मिळण्यास मदत होईल.

**सारांश :-**

देशातील व राज्यातील लिंगगुणोत्तरातील असमतोल जर आपण मी करु शकलो नाही तर, स्त्रियांची संख्या आनखी कमी होईल. ज्यामुळे निसर्गाच असंतुलन विघडेल. एक सदृढ समाजाच्या निर्मितीसाठी, मानवंशाच्या सुरक्षीततेसाठी व राष्ट्रनिर्माणसाठी लिंगगुणोत्तरातील असमतोल कमी करणे, त्यासाठी शासकीय व सामाजिक पातळीवर प्रयत्न करण्याची अधिक गरज आहे.

**संदर्भ सूची :**

1) माधुरी साकुळकर - सकाळ दि. 17/02/2018
2) आनंद पवार - लोकसत्ता दि.06/10/2018
3) Demography Vol 37 (June-Jun 2000)
4) Nishi Dixit ,"Tribes and Tribles Struggle for surviral" Vista International Publication New Delhi.
5) Census of India. 1991, 2001, 2011
6) रामकृष्ण सोळुंके / कैलास ठोंबरे-अर्थबोध Feb 2007
7) ज. श. आपटे - लोकसत्ता दि. 24/09/2014

Scanned with Oken Scanner